# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि.

**दिनांक:09.09.2026** **वार:बुधवार**

---

**ठळक बातम्या**

1. नवोन्मेष आणि समावेशन केंद्रस्थानी ठेवून भारतानं वित्ततंत्रज्ञान क्षेत्राच्या प्रवासात नवी उंची गाठली असल्याचं पंतप्रधानांचं प्रतिपादन.
2. पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या तीन महत्त्वाच्या टप्प्यांचं पंतप्रधानांच्या उपस्थितीत लोकार्पण.
3. शासकीय, निमशासकीय नोकर भरतीत यशस्वी खेळाडूंना 5 टक्के आरक्षण देण्याबाबतच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रीमंडळाची मंजूरी.
4. मराठा आरक्षणासंदर्भात उच्चस्तरीय समितीची आज छत्रपती संभाजीनगरमध्ये महत्त्वाची बैठक.

**पंतप्रधान जी.एफ.एफ.**

भारतानं नवोन्मेष आणि समावेशन यांना केंद्रस्थानी ठेवून वित्ततंत्रज्ञान क्षेत्राला नवी उंची प्राप्त करुन दिली आहे असं प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं. ते काल मुंबईत ग्लोबल फिनटेक फेस्टच्या उद्घाटन समारंभात बोलत होते. नवनव्या तंत्रज्ञानांमुळे आर्थिक क्षेत्रात नव्या संधी निर्माण होत असल्याचं सांगून ते म्हणाले...

***21वीं सदी का दूसरा क्वार्टर हमारे लिए और भी नई संभावनाओं को लेकर आया है। एजेंटिक एआई टोकनाइजेशन, क्वांटम ऐसी टेक्नोलॉजी फाइनेंशियल सेक्टर में नई संभावनाओं के द्वार खोल रही है। अब हमारे सामने चुनौती है। इन संभावनाओं को वास्तविक इम्पैक्ट में कैसे बदलें।***

भारताची युपीआय प्रणाली हे वित्ततंत्रज्ञान क्षेत्रातलं सर्वात मोठं यश असल्याचं म्हणत सध्या 11 देशांमधे ही प्रणाली वापरली जात आहे अशी माहिती पंतप्रधानांनी दिली. युपीआयच्या यशाविषयी पंतप्रधान म्हणाले...

***भारत की फिनटेक स्टोरी अद्भुत रही है। और इसका एक बड़ा चैम्पियन है हमारा यूपीआई। मैंने पिछले साल भी इसकी चर्चा की थी। लेकिन ये इतनी बड़ी ट्रांसफॉर्मेशन है कि जब भी फिनटेक की चर्चा होगी तो वो यूपीआई के बिना अधूरी ही होगी।***

वित्ततंत्रज्ञान हे आर्थिक समावेशनाचं साधन बनावं अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. वित्ततंत्रज्ञान कंपन्यांनी सर्वोच्च सायबर सुरक्षा, नैतिक डेटानिर्मिती मानकं, वित्ततंत्रज्ञान आधारित मजबूत औद्योगिक नवोन्मेष परिसंस्था आणि वित्ततंत्रज्ञान ग्राहक संरक्षण निर्देशांक यांची निर्मिती करावी असं आवाहन मोदी यांनी केलं.

**पंतप्रधान जे.एन.पी.टी.**

पंतप्रधानांच्या हस्ते काल पश्चिम समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिकेच्या 326 किलोमीटर लांबीच्या आणि 20 हजार 700 कोटी रुपयांहून अधिक खर्चाच्या तीन महत्त्वपूर्ण टप्प्यांचंही लोकार्पण करण्यात आलं. यामध्ये महाराष्ट्रातल्या न्यू उंबरगाव ते न्यू सफाळे आणि न्यू सफाळे ते जवाहरलाल नेहरु पोर्ट ट्रस्ट या मार्गांचा समावेश आहे. पश्चिम आणि पूर्व समर्पित मालवाहतूक रेल्वे मार्गिका देशाच्या मालवाहतूक, साठवण व्यवस्थेला एक नवी गती आणि दिशा देणारी ठरेल असा विश्वास पंतप्रधान मोदी यांनी यावेळी व्यक्त केला.

प्रवासी आणि मालवाहतुकीसाठी स्वतंत्र रेल्वेमार्ग उपलब्ध झाल्यामुळे दररोज 430 पेक्षा जास्त मालगाड्या धावणं शक्य होणार आहे. त्यामुळे इंधन बचत, मालवाहतुकीच्या खर्चात घट आणि पर्यावरण रक्षण यांसारखे अनेक फायदे होत आहेत. एका मार्गिकेत केलेल्या गुंतवणुकीतून अनेक फायदे होत असल्याचं पंतप्रधानांनी नमूद केलं. रेल्वेच्या आधुनिकीकरणावर केल्या जात असलेल्या खर्चामुळे मोठ्या प्रमाणात नवीन रोजगार निर्मिती होत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

जे.एन.पी.टी. इथं झालेल्या या कार्यक्रमाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसंच अन्य मंत्री आणि अधिकारी उपस्थित होते.
मालवाहतुकीसाठी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाल्यामुळे सध्याच्या रेल्वे मार्गावरच्या प्रवासी रेल्वेगाड्यांना अधिक वेगानं आणि वेळेत धावण्यास मदत होईल असं राज्यपाल म्हणाले. तर 2030 पर्यंत जे.एन.पी.टी. हे देशातलं सर्वाधिक क्षमता असलेलं पहिलं बंदर ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला. मालवाहतूक समर्पित मार्गिकेमुळे होणाऱ्या फायद्यांविषयी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

***जो आपला पश्चिमी किनारा आहे. या किनाऱ्यावर आपलं जे जेएनपीटी सारखं पोर्ट आहे. याचा फायदा भारताच्या बृहद भागाला देण्याकरता हा एक अत्यंत महत्त्वाचा प्रकल्प या ठिकाणी आहे. आज आपल्या देशाला ज्यावेळेस ग्लोबल सप्लाय चेनचा भाग म्हणून काम करायचं आहे, त्यावेळी आपल्यासमोर सगळ्यात मोठा प्रश्न जर काही असेल, तर लॉजिस्टिक्सच्या मूव्हमेंटची कॉस्ट. येत्या काळामध्ये मला विश्वास आहे, डी.एफ.सी. ज्यावेळी पूर्णपणे आपण सुरू करू, त्यावेळी 7 टक्क्यांपेक्षाही खाली आपण आणू शकू आणि त्यातनं खऱ्या अर्थानं जगाच्या पाठीवर आपल्याला एक सप्लाय चेनचं एक मोठं केंद्र म्हणून या ठिकाणी आपलं काम होईल.***

**मंत्रीमंडळ निर्णय**

यशस्वी खेळाडूंना शासकीय, निमशासकीय आणि इतर क्षेत्रात 5 टक्के आरक्षण देण्याबाबतच्या सुधारित धोरणाला काल राज्य मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. राज्यातली सार्वजनिक आरोग्य व्यवस्था सुदृढ करण्यासाठीच्या प्रगती म्हणजेच आधुनिक प्रशासन आणि सहज उपलब्ध तंत्रज्ञानाच्या समन्वयातून प्राथमिक आरोग्यसेवा सुधारण्याच्या प्रकल्पालाही मंत्रीमंडळानं मान्यता दिली. सोलापूर जिल्ह्यात माढा इथं जिल्हा आणि अतिरिक्त सत्र न्यायालय स्थापन करण्यासाठी आवश्यक पदं आणि खर्चाच्या तरतुदीला तसंच नागपूरमधे कोराडी इथं तीर्थक्षेत्र विकास आराखड्याअंतर्गत विकसित करण्यात येत असलेल्या शासकीय जमिनी श्री महालक्ष्मी जगदंबा संस्थानाला देण्यासही मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

**आबिटकर**

काल मंत्रिमंडळानं मंजुरी दिलेल्या प्रगती प्रकल्पामुळे आरोग्य सेवांचा विस्तार, गुणवत्तावाढ आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर यांना गती मिळणार आहे. पाच जिल्हा रुग्णालयांचं श्रेणीवर्धन होणार असल्यानं 1,600 खाटांची वाढ अपेक्षित असल्याचं सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी सांगितलं. 2026 ते 2031 या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी आशियाई विकास बँकेकडून 70 टक्के कर्ज मिळणार आहे. तर 30 टक्के राज्य शासनाचा हिस्सा राहणार आहे.

**आशा भोसले**

दिवंगत पार्श्वगायिका आशा भोसले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या सांगितिक प्रवासाचा आढावा घेणाऱ्या गीताचं काल मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रकाशन झालं. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार, संगीतकार ए. आर. रहमान यांच्यासह आशा भोसले यांचे कुटुंबीय यावेळी उपस्थित होते. कृत्रीम बुद्धिमत्ता-एआयच्या सहाय्याने तयार करण्यात आलेलं हे गाणं प्रसिद्ध संगीतकार ए. आर. रहमान यांनी संगीतबद्ध केलं आहे.

**मराठा आरक्षण-बैठक**

मराठा आरक्षणाच्या अनुषंगानं निर्माण झालेल्या विविध बाबींचा आढावा घेऊन कुणबी, मराठा-कुणबी आणि कुणबी-मराठा जातीचं प्रमाणपत्र देण्याच्या कार्यपद्धतीतील त्रुटी आणि अडचणींचं निराकरण, प्रलंबित प्रश्नांचा निपटारा तसंच आवश्यक उपाययोजनांबाबत चर्चा करण्यासाठी आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथं उच्चस्तरीय समितीची महत्त्वपूर्ण बैठक होणार आहे. उद्योग आणि मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी काल ही माहिती दिली.

दरम्यान मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी उपोषणाला बसलेल्या मनोज जरांगे पाटील यांची काल वैद्यकीय तपासणी करण्यात आल्यानंतर सलाईन लावून उपचार करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती जिल्हा प्रशासनानं दिली आहे. दरम्यान मराठा समाजाला आरक्षण मिळावे, या मागणीसाठी लातूर जिल्ह्यातील सुमठाना इथं एका तरुणानं आत्महत्या केल्याचा दावा करण्यात येत आहे.

**मराठा आरक्षण-फडणवीस**

मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावर उपस्थित झालेल्या सर्व मुद्द्यांचं सरकारनं निराकरण केलं आहे. तरीही त्यात काही अडचणी वाटत असतील तर मनोज जरांगे यांनी त्यांचं निरसन करून घ्यावं असं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं आहे. ते काल मुंबईत वार्ताहरांशी बोलत होते. मराठा आरक्षण प्रकरणी मनोज जरांगे यांनी उपस्थित केलेल्या सर्वच मुद्द्यांवर सकारात्मक भूमिका घेऊन सरकारनं एक पाऊल पुढे टाकलं आहे. आता त्यांनी सकारात्मक प्रतिसाद द्यावा असं मराठा आरक्षणविषयक मंत्रीमंडळ उपसमितीचे अध्यक्ष राधाकृष्ण विखे-पाटील यावेळी म्हणाले.

**मेगा प्रोजेक्ट**

नाशिक जिल्ह्यातल्या येवला औद्योगिक क्षेत्रात 760 कोटी रुपये गुंतवणुकीच्या माध्यमातून 3 हजार 200 रोजगार निर्मिती करणारा मेगा प्रोजेक्ट मंजूर करण्यात आला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत काल मुंबईत उद्योग विभाग आणि सुखजीत स्टार्च अँड केमिकल्स यांच्यामध्ये या 'मेगा प्रोजेक्ट' च्या उभारणीबाबतचा

सामंजस्य करार करण्यात आला.  या प्रकल्पात  मका प्रक्रिया आणि त्यापासून विविध मूल्यवर्धित उत्पादनांची निर्मिती होणार आहे.

**परिषद**

विकसित महाराष्ट्र 2047 या ध्येयपूर्तीसाठी आरोग्य क्षेत्र महत्त्वाचा आधारस्तंभ ठरणार आहे. राज्याला वैद्यकीय तंत्रज्ञान, डिजिटल हेल्थ, जैवतंत्रज्ञान, संशोधन आणि प्रगत वैद्यकीय उपकरण निर्मितीचं जागतिक केंद्र बनवण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचं प्रवासी महाराष्ट्रीय संपर्क मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितलं. ते काल भारतीय उद्योग महामंडळातर्फे आयोजित 'सीआयआय हॉस्पिटल' टेक परिषदेत बोलत होते.

**विशेष रेल्वे**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन दक्षिण मध्य रेल्वेनं 'नांदेड-सावंतवाडी रोड-नांदेड' ही विशेष रेल्वेगाडी चालवण्याचा निर्णय घेतला आहे. या विशेष सेवेमुळे मराठवाडा आणि कोकण हे भाग प्रथमच थेट रेल्वे सेवेनं जोडले जाणार आहेत. या रेल्वेमुळे मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणातली अनेक महत्त्वाची शहरं आणि पर्यटनस्थळं एकमेकांशी जोडली जातील.

**हवामान**

आज कोकणात बहुतांश ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज आहे. तर मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात तुरळक ठिकाणी पावसाची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्राचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.**

**नमस्कार.**